सं.फौ.ख.क्र.४१६/२०२५.
शासन विरुध्द अमितकुमार.
नि.क्र. ८ पुढे सुरू.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**

मी देवाची शपथ खरे सांगते की,
माझे नाव – रोहिणी अक्षय सावंत.
वय – २९ वर्षे, कामधंदा – गृहिणी.
राहणार – सोनगिरवाडी, वाई, तालुका वाई, जिल्हा सातारा.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता सौ. ए. आर. सुळ -**

दिनांक ११.०५.२०२५ रोजी मी वाई वरून लोहारे गावी आमच्या बलेनो कार क्रमांक एम.एच-११-डी.ए-३३४२ ने जात होते. त्यावेळी, माझे पती ती कार चालवित होते. त्यावेळी, मी व माझी मुलगी ईरा अक्षय सावंत शेजारील सिटवर बसलो होतो. त्यावेळी, ईराचे वय केवळ १ वर्षे होते. सदर अपघातामध्ये आम्हाला काय दुखापत झाली होती हे माहिती नाही. आमच्यावर दवाखान्यात उपचार झाले होते. सदरचा अपघात कसा झाला होता हे मला माहिती नाही.

**सदर साक्षीदार सरकारपक्षाच्या कथनास समर्थन करीत नसल्याने त्यास सहायक सरकारी अभियोक्ता हयांनी उलटतपसाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ११.०५.२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजणेच्या सुमारास मी माझ्या कुटूंबियांसह उपरोक्त कारने माझ्या सासूला भेटण्यासाठी लोहारे येथे जात होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी सुमारे ४.१५ वाजताच्या सुमारास एम.आय.डी.सी. रोड वाई येथील शुभम किराणा स्टोअर्स जवळ आमच्या गाडीला अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सदरचा अपघात समोरून येणारी ओमनी कार क्रमांक एम.एच-११-ए.डब्लू-५७१२ हिने जोरात आमच्या कारला धडक दिल्याने झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आमची कार चारीमध्ये जावून पडली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या पतीच्या पोटाला व छातीला तसेच मला डोक्याला व चेह-याला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या मुलीला देखील

किरकोळ दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरील अपघातामध्ये आरोपीने धडक दिल्याने माझ्या गाडीचे इंजिनचे सुध्दा नुकसान झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी ओमनी चालक व ओमनीमधील लोकांना तेथील हजर लोकांनी दवाखान्यात उपचाराकरीता पाठविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या पतीला तेथील लोकांच्या चर्चेतून आरोपीचे नाव अमित कोकाटे असे असल्याचे कळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, माझ्या पतीने आरोपीविरूध्द घटनेची फिर्याद दिली होती. आता मला माझे नाव असलेल्या जबाबातील अधोरेखांकित भाग-अ वाचून दाखविण्यात आला. तसे मी पोलिसांना सांगितले नव्हते. परंतु, पोलिसांनी तो जबाब तसा का लिहून घेतला याचे कारण मला सांगता येणार नाही. मी आरोपीस ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमची आरोपीशी प्रस्तुतचे प्रकरण न चालविणेबाबत तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण,**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री खडसरे यांच्यातर्फे</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कारला नेमका कसा अपघात झाला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे नाव मी पोलिसांना कधीही सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझा कोणताही जबाब पोलिसांनी नोंदविलेली नव्हता.

**<u>उलटतपास पुर्ण</u>.**

***<u>फेरतपास काहीही नाही</u>.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. २३.०३.२०२६.

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१,वाई.